नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६

सरकार वि. दादासाहेब वगैरे व इतर

निशाणी क्र. ७८

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– रमाकांत रत्नाकर सोहनी

**वय** :– ३५ वर्षे, **धंदा** :– दूध डेअरी व्यवसाय

**राहणार** :– गोमेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए. पी. केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत**

१. माझ्या घरी मी आणि आई असे राहण्यास आहे. आम्ही गोमेवाडीमध्ये मागील १० ते १५ वर्षापासून राहत आहे.

२. घटना १० वर्षांपूर्वी संध्याकाळी ७.०० च्या सुमारास घडली होती. त्यावेळी मी गणपती मंदीराच्या येथे पाया पडण्यासाठी गेलो होतो. मी मंदीरातून पाया पडून बाहेर आलो आणि घरी गेलो. त्याठिकाणी लोकं होती. मी काही लक्ष दिले नाही. पोलिसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी केली नाही, माझा जबाब नोंदविला नाही.

**सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहा. सरकारी वकील यांना तोंडी विनंती वरुन साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली**

३. हे मला आठवत नाही की, मी दिनांक १६/०९/२०१६ रोजी गणपती मंदिरात पाया पडण्यासाठी गेलो होतो अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, मी आशिष सोहनी, विक्रम देवकुळे, प्रदीप सरगर यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, ते तिघेजण गणपती मंदिराजवळ होते. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात हजर असलेल्या आरोपींना ओळखतो. असे घडले नाही की, आरोपी क्र.३ प्रदीप सरगर यांनी आशिष सोहनी आणि विक्रम देवकुळे यांना,'' तुम्ही इथे का थांबला आहात'' असे माझ्यासमक्ष विचारुन शिवीगाळी केली होती. असे घडले नाही की, त्यांनी शिवी देवू नको असे म्हणाल्यानंतर आरोपी क्र.३ याने विक्रम देवकुळे याच्या कानपाडात मारले आणि खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. असे घडले नाही की, आशिष याने विक्रम याला सोडवले आणि ते परत जात असताना आरोपी क्र.१, २ व ४ हे त्याठिकाणी आले होते. असे घडले नाही की, आरोपी क्र.१, २ व ४ यांनी आशिष व विक्रम यांना ''तुम्हाला मघाशी मस्ती आली होती'' असे म्हणून आरोपी क्र.३ यांने देखील त्यांना लाथा–बुक्क्यांनी मारहाण

नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६
**सरकार वि. दादासाहेब वगैरे व इतर**
**निशाणी क्र. ७८**

केली. असे घडले नाही की, त्यावेळी आरोपी क्र.१ दादासाहेब पाटील याने त्याच्या कमरेचा असलेला चाकू काढून आशिष सोहनी याच्या डाव्या हाताच्या पोटरीवर मारले आणि रक्ताची जखम केली.

४. मी समाधान ऐवळे आणि सतिश देवकुळे यांना ओळखतो. मी नानासो तुकाराम देवकुळे यांना ओळखत नाही. असे घडले नाही की, मी, समाधान, सतिश आणि नानासो अशांनी भांडणाची सोडवासोडव केली, त्यावेळी आरोपींनी विक्रम व आशिष यांना जात असताना''जिवंत सोडणार नाही'' अशी धमकी दिली होती.

५. हे म्हणणे खरे नाही की, दि.१७/०९/२०१६ रोजी पोलिसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझा जबाब नोंदविला होता. आता मला माझ्या बयाणातील पोर्शन मार्क–अ वाचून दाखविला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. सदर बाब माझ्या बयाणात नमूद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही.

६. मी आरोपींना ते आमच्या गावातील असल्यामुळे ब–याच वर्षांपासून ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना शिक्षा होवू नये असे मला वाटत असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे – श्री. डी.व्ही.शिंदे विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

७. हे म्हणणे खरे आहे की, मी मंदिरातून पाया पडून बाहेर आल्यानंतर त्याठिकाणी ब–याच लोकांची गर्दी होती. हे मला आठवत नाही की, गर्दीला सांभाळण्यासाठी त्याठिकाणी पोलीस तैनात केले होते किंवा कसे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,
समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.01.13 13:45:09 +0530

दि. १३/०१/२०२६
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी